**MHND200000392024**

दाखल तारीख : १६/०१/२०२४

नोंदणी तारीख : १६/०१/२०२४

निकाल तारीख : १०/०६/२०२६

कालावधी : ०२ व. ०४ म. २५ दि.

# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर जि. नांदेड यांचे न्यायालयात

(पिठासिन अधिकारी श्री. बी. ए. अग्रवाल यांचे समोर)

**नियमित फौजदारी खटला क्र.३/२०२४** **निशाणी क्र. ३७**

| | |
|---|---|
| महाराष्ट्र सरकार तर्फे,<br>पोलीस ठाणे, माहुर (गुन्हा क्र.११४/२०२३),<br>ता. माहूर जि. नांदेड. | **अभियोगपक्ष** |
| सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ती श्रीमती प्रसन्ना जांगडे | **सादरकर्ते** |

**<u>विरुध्द</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | अश्विन सुभाष चव्हाण<br>वय : ३० वर्षे, व्यवसाय : शेती, | **आरोपीं** |
| २. | अजय सुभाष चव्हाण<br>वय :२९ वर्षे, व्यवसाय : शेती, | |
| ३. | मिराबाई सुभाष चव्हाण<br>वय :४२ वर्षे, व्यवसाय : शेती,<br>सर्व रा. पाचुंदा ता. माहूर जि. नांदेड. | |
| सुविद्य विधिज्ञ श्री. चेतन राठोड | | **सादरकर्ते** |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०९/२०२३ |
| फिर्याद दाखल तारीख | २९/०९/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १६/०१/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १६/०१/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २४/०६/२०२४ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | – |
| निकालाची तारीख | १०/०६/२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख (शिक्षा झाली असेल तर) | नाही. |

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. कलम ४२८ साठी खटला सुरु असतांना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अश्विन सुभाष चव्हाण | फौ.प्र.सं. कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस. | १६/०१/२०२४ | भा.दं.वि. कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्त. | लागू पडत नाही. | लागू पडत नाही. |
| २. | अजय सुभाष चव्हाण | | | | | | |
| ३. | मिराबाई सुभाष चव्हाण | | | | | | |

**भाग 'क'**

फौजदारी व्यवहार संहिता भाग ६ परिच्छेद ४४(३)

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार:**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | गोवर्धन टुलसिंग पवार | साक्षीदार | १८ |
| २. | पंडीत टुलसिंग पवार | साक्षीदार | १९ |
| ३. | प्रकाश सोमला राठोड | प्रथम खबरी | २० |
| ४. | कविता प्रकाश राठोड | जखमी साक्षीदार | २४ |
| ५. | बाबू नानु जाधव | तपास अधिकारी | २७ |
| ६. | डॉ. बालाजी केशवराव तेलंग | वैद्यकीय अधिकारी | ३१ |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार:**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क) न्यायालयाने तपासलेले साक्षीदार:**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**<u>कागदोपत्री पुराव्याची यादी/निशाणी:</u>**

**अ) अभियोगपक्ष:**

| अ.क्र. | निशाणी | कागदोपत्री पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | २१ | प्रथम खबर |

| | | |
|---|---|---|
| २. | २८ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ३२ | सा.क्र.४ चे विधी वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | ३३ | सा.क्र.३ चे विधी वैद्यकीय प्रमाणपत्र |

**ब) बचाव पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी | कागदोपत्री पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**क) न्यायालय:**

| अ.क्र. | निशाणी | कागदोपत्री पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड) मुद्देमाल वस्तु:**

| अ.क्र. | निशाणी | मुद्देमाल वस्तुचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | वस्तु 'अ' | एक काठी |

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १० जून, २०२६)

**१.** प्रस्तुतच्या खटल्यात आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दोषारोप ठेवून खटल्याची संपरिक्षा करण्यात आली.

**<u>अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे:</u>**

२. दि. २७/०९/२०२३ रोजी फिर्यादी व त्याची पत्नी नामे कवीताबाई असे शेतात कामासाठी गेले होते. तेव्हा वेळ अंदाजे दुपारचे ०३.०० वा दरम्यान फिर्यादीची पत्नी ही बैलांसाठी त्यांच्या शेतातील सामाईक धुर्यावरून त्यांच्या शेताचे बाजुने गवत कापत असतांना त्यांच्या शेता शेजारी असलेली आरोपी मिराबाई सुभाष चव्हाण हिने फिर्यादीच्या पत्नीस ''गवत का कापतेस आमचे बैल चरतात'' असे म्हणाली, तेंव्हा फिर्यादीच्या पत्नीने, "मी आमचे बाजुचे धुर्यावरून गवत कापत आहे''असे म्हणाली असता, आरोपी मीराबाई हिचा लहान मुलगा नामे अश्वीन सुभाष चव्हाण हा धावत तेथे आला व त्याने त्याच्या हातातील लाकडाने फिर्यादीच्या पत्नीच्या उजव्या हातावर जोराने मारले. तेंव्हा फिर्यादी तेथे त्याच्या पत्नीस सोडवण्यास गेला असता, आरोपी मिराबाई हिचा मोठा मुलगा नामे अजय सुभाष चव्हाण हा तेथे आला व त्याने फिर्यादीला खाली पाडले व लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर तिनही आरोपींनी मिळून फिर्यादी व त्याच्या पत्नीला लाकडाने व लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली तसेच "तूम्हा दोघांना जीवंत मारून टाकतो" अशी धमकी दिली. त्यावेळेस तेथे त्यांचे शेतशेजारील पंडीत टुलसींग पवार व गोवर्धन टुलसींग पवार ह्या दोघांनी त्यांना उचलुन दवाखाण्यात नेले. त्यानंतर फिर्यादी व त्याची पत्नी यांनी उमरखेड येथे उपचार घेतला तेंव्हा फिर्यादीचे पत्नीचा हात फॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगीतले होते. त्यानंतर त्यांनी उपचार पुर्ण करून पोलिस स्टेशन माहूर येथे येवुन तक्रार दिली. अशा आशयाच्या खबरीवरून आरोपीं विरुद्ध माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र.११४/२०२३ ची नोंद करण्यात आली.

३. आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर माहूर पोलीस ठाण्यात तत्कालीन कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबू जाधव याने गुन्ह्याचा तपास केला. त्याने घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. जखमीचे विधी वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. घटनास्थळावरून एक लाकडी काठी जप्त केली व शेवटी आरोपीं विरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्यामुळे या

न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे सुविद्य पूर्व अधिकारी यांनी निशाणी क्र.१४ वर आरोपीं विरुध्द दोषारोप निश्चित केला. आरोपींनी 'गुन्हा कबुल नाही' असे निवेदन केले.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवदेन निशाणी ३४ ते ३६ वर नोंदविण्यात आले. आरोपींचा बचाव खोटा खटला केल्याचा आहे.

६. अभियोगपक्षातर्फे सुविद्य सरकारी वकील श्रीमती प्रसन्ना जांगडे व आरोपींचे सुविद्य विधिज्ञ श्री. चेतन राठोड यांचा युक्तीवाद ऐकला.

७. अभिलेखावरील सर्व पुराव्याचे अवलोकन केले. त्यावरुन खालील प्रश्न माझ्यासमोर उपस्थित झाले. ते प्रश्न व त्यावरील कारणमिमांसेसह त्यांची उत्तरे मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले का की, दिनांक २७/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान मौजे पाचुंदा ता. माहूर जि. नांदेड येथे आरोपींनी त्यांच्या समान हेतुने प्रथम खबरीची पत्नी कविताबाई हिला लाकडी काठीने तिच्या उजव्या हातावर मारहाण करून हाताचा अस्थीभंग होवुन ईच्छापूर्वक जबर दुखापत पोहोचविली ? | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्षाने असे सिद्ध केले का की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुने प्रथम | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | खबरी व त्याची पत्नी कवीताबाई यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली? | |
| ३. | अभियोगपक्षाने असे सिद्ध केले का की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुने प्रथम खबरी व त्याची पत्नीच्या हातून शांतता भंग किंवा अपराध घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करून त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्यांना प्रक्षोभित केले? | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्षाने असे सिद्ध केले का की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुने प्रथम खबरी व त्याच्या पत्नीला जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशाह केला? | नकारार्थी. |
| ५. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>प्रश्न क्र.१ ते ४ साठीः–</u>**

८. अभियोगपक्षाद्वारे आरोपींचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

९. अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ गोवर्धन टुलसिंग पवार याची साक्ष निशाणी क्र.१८ वर व साक्षीदार क्र.२ पंडीत टुलसिंग पवार याची साक्ष निशाणी क्र.१९ वर नोंदविण्यात आली. अभियोगपक्षाच्या कथनानुसार सदर दोन्ही साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. सदर दोन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास आरोपींविरूद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी कोणतेही सहाय्य केले नाही. सुविद्य सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासात विचारले जाणारे प्रश्न या साक्षीदारांना विचारले. परंतु सदर दोन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास

कोणतेही सहकार्य केलेले नाही. त्यामुळे दोन्ही साक्षीदारांची साक्ष ही अभियोगपक्षास आरोपींचा गुन्हा सिद्ध करण्यास उपयुक्त ठरणार नाही.

**१०.** अभियोगपक्षाद्वारे फिर्यादी प्रकाश सोमला राठोड याची साक्ष निशाणी क्र.२० वर नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, आरोपीं हे त्याचे शेजारी असुन घटना ही शेतात दुपारी ३ वाजताच्या सुमारास त्याच्या आणि आरोपीच्या शेताच्या सामाईक बांधावर घडली होती. घटनेच्या वेळेस त्याची पत्नी कविता ही बांधावर गवत कापत होती. त्यावेळेस सर्व आरोपीं हे तेथे पळत आले व फिर्यादीच्या पत्नीला म्हणाले की, ''गवत कापु नको'' तेव्हा फिर्यादीच्या पत्नीने सांगितले की, ''मी आमच्या बाजुचे गवत कापत आहे.'' सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, त्यावेळेस आरोपी अश्वीन याने काठीने त्याच्या पत्नीला उजव्या हातावर मारहाण केली होती, तेव्हा तो तेथे पळत गेला. त्यावेळेस आरोपींनी फिर्यादीला सुद्धा धक्काबुक्की केली. घटनेच्यावेळेस पंडीत पवार व गोवर्धन पवार हे तेथे भांडण सोडवण्यासाठी आले होते. त्यांनी भांडण सोडवले व त्यानंतर उपचारासाठी उमरखेड येथील खाजगी दवाखान्यात नेले. फिर्यादीच्या कथनानुसार उमरखेड येथे दोन दिवस उपचार घेतले तेथे फिर्यादीच्या पत्नीच्या उजव्या हाताचा अस्थीभंग झाला. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

**११.** सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये ही बाब मान्य केली की, सन २०२३ मध्ये त्याच्याकडे बैल नव्हते. सदर साक्षीदाराने ही बाब सुद्धा मान्य केली की, आरोपी आणि त्यांच्यामध्ये न्यायालयात अतिक्रमणाबाबत दिवाणी प्रकरण सुरु आहे. सदर साक्षीदाराने ही बाब सुद्धा मान्य केली की, आरोपींनी दिनांक २७/०९/२०२३ रोजी त्याच्याविरूद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती त्यामुळे त्यालासुद्धा आरोपींविरूद्ध तक्रार द्यावे असे वाटले होते. शेवटी त्याने ही बाब सुद्धा मान्य केली की, त्याचे आणि आरोपींचे बरेच दिवसांपासुन पटत नाही.

**१२.** अभियोगपक्षाद्वारे जखमी साक्षीदार म्हणजे साक्षीदार क्र.४ कविता प्रकाश राठोड हिची साक्ष निशाणी क्र.२४ वर नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने तिच्या सरतपासात असे कथन केले की, फिर्यादी प्रकाश हा तिचा पती आहे. सदर साक्षीदाराच्या कथनानुसार घटना ही अंदाजे दिड वर्षापूर्वी घडली होती. घटनेवेळेस ती व तिचा पती शेतात दुपारी ३ वाजता गवत कापत होते. आरोपी मिराबाई तेथे आली व तिने तिला गवत न कापण्यास सांगितले. त्यानंतर मिराबाईचे दोन मुले अश्विन आणि अजय तेथे आले. सदर साक्षीदाराने तिच्या सरतपासात पुढे असे कथन केले की, तिला आरोपी अश्विन याने उजव्या हातावर काठीने मारहाण केली. सदर साक्षीदाराने ज्या काठीने तिला मारहाण झाली ती काठी न्यायालयासमक्ष ओळखली. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, आरोपी अजय याने तिच्या पतीला मारहाण केली. त्यानंतर शेजारी गोवर्धन पवार हा तेथे आला व त्याने त्यांना दवाखान्यात नेले. सदर साक्षीदाराने तिच्या उलटतपासामध्ये ही बाब कथन केली की, गुन्हयात जप्त काठी ही त्यांनीच पोलीसांना दिली होती. तसेच त्यांनी घटनेच्या दिवशी वानोळा येथे दवाखान्यात दाखविले होते.

**१३.** अभियोगपक्षाद्वारे साक्षीदार क्र.५ बाबु नानु जाधव म्हणजे या खटल्यातील तपास अधिकारी याची साक्ष निशाणी क्र.२७ वर नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात त्यांनी केलेल्या तपासाबाबत कथन केले आहे. सदर साक्षीदाराने कथन केले की, दिनांक २९/०९/२०२३ रोजी ते माहूर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असतांना गु.र.क्र.११४/२०२३ चा तपास त्याच्याकडे देण्यात आला होता. तपासादरम्यान त्यांनी दिनांक ३०/०९/२०२३ रोजी सकाळी ०९.०० ते १०.०० वाजताच्या दरम्यान निशाणी क्र.२८ वरील घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरुन त्यांनी एक काठी जप्त केली. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. जखमींचे विधीवैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपींविरूद्ध त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरून असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये त्यांनी

केलेल्या तपासाबाबत कथन केले आहे. सदर साक्षीदाराची साक्षीदाराने ही तांत्रिक स्वरूपाची माहीती दिली आहे. त्यांनी गुन्हा कसा घडला किंवा आरोपीनेच तो केला याबाबत कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत. सदर साक्षीदाराची साक्ष ही फक्त कागदोपत्री प्रक्रिया दर्शविते. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही आरोपींविरूद्ध त्यांच्या गुन्हा सिद्ध करण्यास अभियोगपक्षास सहकार्य करणारी नाही.

**१४.** अभियोगपक्षाद्वारे साक्षीदार क्र.६ डॉ.बालाजी केशवराव तेलंग म्हणजे वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष निशाणी क्र.३१ वर नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, दिनांक २९.०९.२०२३ रोजी ते ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत होते. पोलीसांनी कविता प्रकाश राठोड व प्रकाश सोमला राठोड या रुग्णांना पत्रासह वैद्यकीय तपासणीसाठी त्यांच्याकडे पाठविले होते. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पुढे असे कथन केले की, जखमी साक्षीदार कवीता हिच्यावरती कोणतीही बाह्य जखम मिळून आली नाही. तसेच तिने खाजगी रुग्णालयात अस्थिभंग झाल्याबाबत उपचार घेतले होते. तसेच तिने तिच्या उपचाराचे कोणतेही कागदपत्र दाखविले नव्हते. तिच्या उजव्या हातावरती प्लास्टर होते. त्यानुसार त्यांनी जखमी साक्षीदार कवीता हिच्यासाठी निशाणी क्र.३२ वरील वैद्यकीय कायदेशीर प्रमाणपत्र जारी केले. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, त्यानंतर त्यांनी फिर्यादी प्रकाश सोमला राठोड याची तपासणी केली. त्यांना त्याच्या उजव्या अंगठ्यावर आणि पाठीवर बोथट वस्तुने झालेली दुखापत आढळुन आली. त्यानुसार त्यांनी सदर रुग्णाला निशाणी क्र.३३ वरील वैद्यकीय कायदेशीर प्रमाणपत्र जारी केले. सदर साक्षीदाराने त्याच्या उपलटतपासामध्ये ही बाब कथन केली की, फिर्यादी प्रकाश राठोड याला तपासणीवेळी बाह्य जखम आढळून आलेली नाही.

**१५.** अभियोगपक्षाच्या एकत्रित पुराव्यांचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाची संपुर्ण भिस्त ही फिर्यादी व जखमी

साक्षीदाराच्या साक्षीवर पुर्णपणे अवलंबुन आहे. फिर्यादी व जखमी साक्षीदाराच्या साक्षीचे एकंदरीत वाचन केले असता, असे निदर्शनास येते की, फिर्यादी प्रकाश याने त्याच्या उलटतपासणीत स्पष्टपणे मान्य केले आहे की, आरोपी आणि त्यांच्यामध्ये न्यायालयात अतिक्रमणाबाबत दिवाणी प्रकरण प्रलंबित आहे. तसेच त्यांचे आणि आरोपींचे बरेच दिवसांपासून पटत नाही. फौजदारी कायद्याच्या तत्त्वांप्रमाणे, जिथे पूर्ववैमनस्य असते, तिथे खोट्या तक्रारीची शक्यता नाकारता येत नाही; त्यामुळे पुराव्यांची अत्यंत काटेकोर तपासणी करणे आवश्यक ठरते.

**१६.** अभिलेखावर आलेल्या पुराव्यांवरून असे निदर्शनास येते की, फिर्यादीने त्याच्या उलटतपासणीत ही अत्यंत महत्त्वाची बाब मान्य केली आहे की, दिनांक २७/०९/२०२३ रोजी आरोपींनी फिर्यादीविरुद्ध पोलीस ठाण्यात प्रथम तक्रार दिली होती. फिर्यादीने स्वतः कबूल केले की, आरोपींनी तक्रार दिल्यामुळे *"त्यालासुद्धा आरोपींविरुद्ध तक्रार द्यावी असे वाटले होते."* यावरून फिर्यादीने दाखल केलेली ही तक्रार उत्स्फूर्त नसून, आरोपींच्या तक्रारीला उत्तर म्हणून आणि सूडबुद्धीने दाखल करण्यात आली आहे असा संशय निर्माण होत असून फिर्यादीने दाखल केलेली तक्रार ही संशयाच्या भव-यात येत आहे. फिर्यादी प्रकाश याने त्याच्या तक्रारमध्ये ही बाब कथन केली आहे की, घटनेच्यावेळेस त्याची पत्नी कविता ही त्यांच्या बैलांसाठी सामायिक धु-यावरून गवत कापत होती आणि गवत कापण्याच्या कारणावरूनच सदरचा वाद घडला होता. परंतु फिर्यादीच्या उलटतपासणीत फिर्यादी प्रकाशने हे मान्य केले की, सन २०२३ मध्ये त्याच्याकडे बैलच नव्हते. जर फिर्यादीकडे बैलच नव्हते, तर फिर्यादीची पत्नी कविताबाई ही बैलांसाठी गवत कापत होती हे अभियोगपक्षाचे मूळ कथन असत्य ठरत असुन फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरती दाट संशय निर्माण करत आहे.

**१७.** फिर्यादीने त्याच्या फिर्यादीमध्ये असे कथन केले आहे की, सर्व आरोपींनी त्याला व त्याच्या पत्नीला लाकडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून

शिवीगाळ करून धमकी दिली होती. परंतु फिर्यादीने त्याच्या साक्षीमध्ये त्याला मारहाण झाल्याबाबत किंवा शिवीगाळ झाल्याबाबत तसेच धमकी दिल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने त्याच्या तक्रारीमध्ये नमुद केले की, त्याला व त्याच्या पत्नीला झालेली मारहाणीची घटना ही सत्य वाटत नाही. अभियोगपक्षाच्या कथनानुसार गोवर्धन टुलसिंग पवार व पंडील टुलसिंग पवार हे प्रत्यक्ष साक्षीदार असुन ते घटनेच्यावेळेस भांडण सोडवायला आले होते आणि त्यांनीच दवाखान्यात फिर्यादी व त्याच्या पत्नीला दवाखान्यात नेले होते. परंतु, सदरच्या दोन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या तक्रारीला स्वतंत्र साक्षीदारामार्फत कोणताही दुजोरा मिळालेला नाही.

१८. जखमी साक्षीदार कवीता हिने तिच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, आरोपी अश्विन याने तिच्या हातावर काठीने मारहाण केली होती. तसेच ज्या काठीने मारहाण झाली होती ती काठी त्यांनीच तपासी अधिकारी यांना दिली होती. परंतु, फिर्यादी याने त्याच्या उलटतपासामध्ये गुन्ह्यात जप्त झालेल्या काठीने त्याच्या पत्नीला मारहाण झाल्याची बाब नाकारली आहे. अभियोगपक्षाच्या कथनानुसार साक्षीदार कवीता हिने दोन दिवस उमरखेड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेतले होते. तसेच तेथे तिच्या हाताला अस्थिभंग झालयामुळे प्लास्टर सुद्धा लावण्यात आले होते. परंतु साक्षीदार कवीता हिने उमरखेड येथे दोन दिवस खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्याबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावर अभियोगपक्षामार्फत दाखल करण्यात आलेले नाही. संपूर्ण अभिलेखाचे वाचन केले असता, असे कुठेच ही बाब नमुद नाही की, सदर जखमी साक्षीदाराने कोणत्या डॉक्टरकडे उपचार घेतले होते. तसेच तपासी अधिकारी यांनी सदर उपचार करणा–या डॉक्टरचे जबाब सुद्धा नोंदविल्याचे अभिलेखावर दिसुन येत नाही. त्यामुळे फिर्यादीने दोन दिवस उशिरा दिलेली फिर्याद ही कोणत्या कारणामुळे उशिरा दिली ते कारण अभिलेखावर स्पष्टपणे अभियोगपक्ष सिद्ध करू शकलेला नाही.

**१९.** फौजदारी न्यायशास्त्राचा सुवर्णनियम असा आहे की, अभियोगपक्षाला आपला खटला आरोपींवरील संशयाच्या पलीकडे जाऊन सिद्ध करावा लागतो. केवळ संशय किंवा जखम झाली म्हणून कोणालाही दोषी ठरवता येत नाही. प्रस्तुत प्रकरणात: फिर्यादी व आरोपींमध्ये जुना जमीन वाद असुन आरोपींनी फिर्यादीविरूद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती ही बाब अभिलेखावर सिद्ध झालेली आहे. तसेच वर नमुद केलयाप्रमाणे फिर्यादीने दिलेली त्याची साक्ष व त्याचा पुरावा यात तफावत असून ते विश्वासार्ह नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या फिर्यादीमध्ये केलेल्या घटना हया संशय निर्माण करणा–या आहेत. या सर्व कारणांमुळे अभियोगपक्षाची कथा अत्यंत संशयास्पद आणि केवळ पूर्ववैमनस्यातून रचलेली वाटते. संशयाचा फायदा आरोपींना मिळणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीला व त्याच्या पत्नीला काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब अभियोगपक्ष संशयापलीकडे जाउन सिद्ध करू शकला नाही. म्हणुन मी प्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदवित आहे.

**प्रश्न क्र.५ साठी :**

**२०.** प्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर विचारात घेतले असता, आरोपीं निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये आरोपीं अश्विन सुभाष चव्हाण, अजय सुभाष चव्हाण व मिराबाई सुभाष चव्हाण यांची भारतीय दंड संहिता कलम ३२५, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये ठेवलेल्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींनी दिलेले जमानती बंधपत्र हे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ अ अन्वये पुढील सहा महीन्याकरीता कायम ठेवण्यात येत आहे. त्यानंतर आरोपींचे जमानती बंधपत्र रद्द करण्यात यावे.

३) गुन्हयात जप्त असलेली लाकडी काठी ही मुल्यहीन असल्यामुळे सदर न्यायनिर्णयाच्या आव्हान कालावधीनंतर नाश करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by BHOOMIT ASHOK AGRAWAL
Date: 2026.06.10 16:09:27 +0530

(बी. ए. अग्रवाल)

ठिकाण : माहूर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर

दिनांक : १०/०६/२०२६. जि. नांदेड

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द नि शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | श्रीमती रु. बी. मस्के |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माहूर |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | : | १०/०६/२०२६. |
| न्यायनिर्णयावर पिठासिन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | १०/०६/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | १०/०६/२०२६. |